नि.फौ.ख.क्र. १३९/२०१६

निशाणी क्र. २१

**सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ३ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** – प्रसाद वसंतराव दिघे

**वय** – ३१ वर्षे, **व्यवसाय** – मेकॅनिक

**राहणार** – कोल्हार, ता. राहाता, जि. अहमदनगर.

**सरतपास सरकार तर्फे अधिवक्ता श्रीमती ए.एस.महाले यांचे मार्फत सुरु.**

१. दिनांक १७.०६.२०१६ रोजी पोलीसांनी मला पोलीस स्टेशनला बोलावले नव्हते. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर अनुक्रमांक १ वर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहिती नाही. जप्ती पंचनाम्यावरील **सहीस निशाणी क्र. २२** देण्यात येत आहे.

***(साक्षीदार अभियोगपक्षाला समर्पक उत्तरे देत नसल्यामुळे सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदाराला उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येत आहे).***

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १७.०६.२०१६ रोजी पोलीसांनी माझे समक्ष वाळु चोरी प्रकरणातील पोलीस स्टेशनला आणुन लावलेल्या गाडी क्र. एमएच १९ झेड १३४९ या गाडीचा व त्या गाडीतील अंदाजे साडे तीन ब्रास वाळुचा जप्ती पंचनामा केला, सदर जप्ती पंचनाम्याची वेळी मी व दुसरा पंच हजर होतो व आम्ही सदर पंचनामा वाचल्यानंतर त्यावर सही केली. पोलीस स्टेशन ते कोल्हार एक किमी चे अंतर आहे. कोल्हार लोणी पोलीस स्टेशनच्या हद्दीत येते. हे म्हणणे खरे नाही की माझे पोलीस स्टेशनला जाणेयेणे असते. तपासणीक अंमलदार हे माझ्या ओळखीचे नाही. पोलीसांनी माझी सही घेतली होती परंतु ती कशावर घेतली ते आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की घटना ब–याच वर्षापुर्वीची असल्यामुळे मला आता काही आठवत नाही.

निशाणी क्र. २१

**उलट तपासणी आरोपीकरिता अधिवक्ता श्री. पठारे यांच्या मार्फत सुरु–**

**उलटतपास नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृती,

सही/–

**(पंकज रा. फुलारी)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता.

राहाता

दिनांक – ०७.०४.२०२६